MHAU080024172021

**नियमित दिवाणी दावा क्र. २६५/२०२१**
**सखाराम वि. ग्रामपंचायत अंधारी व इतर**

## निशाणी ५ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रीया संहिता, १९०८ चे आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे प्रतिवादींविरुध्द तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याकरिता केला आहे.

२. **वादी यांचे थोडक्यात कथन असे की,**

वादी हे मौजे अंधारी, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद येथील जुने दुकान क्र. २ ज्याचा नवीन गाळा क्र. १०८ क्षेत्र १२ फुट X २० फुट ज्याची चतुःसिमा पुढीलप्रमाणे आहेत–

पुर्वेस – जमील शेठ यांचे घर,

पश्चिमेस – नजिमोद्दीन मोहम्मद सय्यद यांचे दुकान नं.१०७, त्यानंतर पाच फुटाची बोळ व त्यानंतर ग्रामपंचायत कार्यालय, अंधारी,

दक्षिणेस – जमील शेठ यांची जागा,

उत्तरेस – रोड.

(यापुढे सदर जागेस दावा मिळकत संबोधण्यात आले आहे.)

३. वादीचे कथन असे की, दावा मिळकत ही ग्रामपंचायत अंधारी यांच्या मालकीची असून सन १९९७–९८ मध्ये गावच्या विकासासाठी व ग्रामपंचायतचे उत्पन्न वाढावे म्हणून दावा मिळकत ग्रामपंचायत अंधारी यांनी वादी यांना ३० वर्षाच्या मुदतीसाठी पुन्हा नुतनीकरण

करण्याच्या बोलीवर भाडयाने दिलेली असून ग्रामपंचायतने तसा ठराव घेउन वादी यांचेकडून १०,०००/– रुपये अनामत रक्कम घेउन दावा मिळकतीचा ताबा वादी यांना दिला होता. दावा मिळकत ही आर. सी. सी. मध्ये बांधकाम केलेली असून त्यावर शटर बसविलेले आहे. वादी यांचे पुत्र गणपत सखाराम तायडे हे सुशिक्षीत बेरोजगार असल्याने वादी यांनी त्यांच्या मुलासह दावा मिळकतीत कापड दुकान सन १९९८ मध्ये टाकलेले असून तेव्हापासून आजपर्यंत दावा मिळकतीत वादी यांचे कापड दुकान विनातक्रार व विनाअडथळा चालु असून वादी हे ग्रामपंचायत अंधारी यांना दर महिन्याला नियमित भाडे देत आहेत. वादी यांचे पुढे असे कथन की, त्यांनी सन १९९८ मध्ये दावा मिळकत भाडयाने घेतल्यानंतर सुरुवातीला त्यांना ६००/– रुपये महिना होता व वेळोवेळी ग्रामपंचायतने घेतलेल्या ठरावानुसार सदरचा महिना आज रोजी १२००/– रुपये झालेला असून वादी हे नियमित ग्रामपंचायतला भाडे देत आहेत व त्या संबंधी वादी यांचेकडे भाडे पावत्या उपलब्ध आहेत. वादी यांनी प्रतिवादी यांचेकडून जागा भाडयाने घेतल्यानंतर त्यामध्ये साधारणतः गेल्या वीस ते पंचवीस वर्षापुर्वी एक ते दिड लाख रुपयाचा माल असून वादी व त्यांचे चिरंजीव गणपत यांचा उदरनिर्वाह सदर दुकानावर अवलंबून असून वादी हे सदर दुकानावर आपली उपजिविका भागवत आहेत. वादीचे कथन की, गेल्या एक ते दिड वर्षापुर्वी ग्रामपंचायत अंधारी येथे ग्रामपंचायत निवडणूक होउन त्यामध्ये आज रोजी सत्तेत असलेल्या सत्ताधारी पक्षाचे १० सदस्य व विरोधी पक्षाचे सात सदस्य निवडून आलेले असून विरोधी सदस्य असलेले अरुणाबाई लक्ष्मण तायडे यांचे सासरे सदाशिव गोविंदा तायडे हे ग्रामपंचायतमध्ये सत्ताबदल झाल्यामुळे त्यांच्या जवळ असलेल्या लोकांना त्रास दयावा या उद्देशाने ग्रामपंचायत अंधारी हे ऐनकेन प्रकारे वादी यांना त्रास देउन त्यांची दुकाने खाली करुन सदर ठिकाणी त्यांच्या विचारांच्या लोकांना जागा देउ पाहत आहेत. त्यामध्ये, ते सफल झाले तर वादी यांचे आयुष्यात कधीही भरुन न निघणारे नुकसान होईल.  वादी यांच्या दुकानाच्या पश्चिमेस नजिमोद्दीन मोहम्मद सय्यद यांचे दुकान नंबर १०७ असून त्यानंतर सार्वजनिक पाच फुटाची गल्ली आहे व सदर गल्लीचा वापर संपुर्ण अंधारी येथील लोक रस्त्यासाठी करत असून त्यानंतर ग्रामपंचायतची साधारण अडीच ते तीन हजार चौ. फुट जागा असून त्यावर ग्रामपंचायतचे बांधकाम झालेले आहे व आजही सदर

ठिकाणी ग्रामपंचायत कार्यरत आहे.

**४.** वादी यांचे असे कथन की, सदर ग्रामपंचायत कार्यालयासाठी ग्रामविकास राज्यमंत्री यांनी त्यांच्या निधीतून वीस लाख रुपये दिलेले असून सदर ग्रामपंचायत जागेचे बांधकाम पाडून त्यावर नवीन बांधकाम करण्याचा ठराव ग्रामपंचायत अंधारी यांनी घेतलेला आहे व सदर जागा पाडून त्यावर ग्रामपंचायतचे बांधकाम करण्याऐवजी स्थानिक राजकारण डोळयासमोर ठेउन प्रतिवादी हे वादी यांच्या दुकानाचे पक्के असलेले आरसीसी बांधकाम पाडू पाहत आहे व त्यासाठी प्रतिवादी यांनी वादी यांना दिनांक ०१.०६.२०२१ रोजी व दिनांक १५.०७.२०२१ रोजी सात दिवसात सदरील जागा खाली करण्यासंबंधी विधीबाह्य नोटीस दिलेली आहे. वादींचे कथन असे की, प्रतिवादी हे करत असलेली कार्यवाही राजकीय द्वेषापोटी असून त्यांनी सदर कार्यवाहीत मुंबई ग्रामपंचायत अधिनियम मध्ये ठरवून दिलेल्या तरतुदींचे पालन केलेले नाही. तसेच भाडे करारनामा कायदयाच्या तरतुदीनुसार कायदेशीर कार्यवाही न करता मनमानीने राजकीय द्वेषापोटी गरज नसतांना चुकीची कार्यवाही करत असल्याने त्यांना तात्काळ पावबंद करण्याची विनंती केलेली आहे. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १८० नुसार प्रतिवादी ही ग्रामपंचायत असल्याने त्यांचेविरुध्द दावा दाखल करण्यासाठी त्यांना दावा दाखल करण्यापुर्वी नोटीस देणे गरजेचे आहे. परंतु सदर प्रकरणात प्रतिवादी यांनी वादी यांना फक्त दोन दिवसांचा वेळ दिल्याने सदरची नोटीस पाठविण्यात वादी यांनी वेळ घालविल्यास प्रतिवादी हे त्याच्या ध्येय आणि उद्देशात सफल होतील, म्हणून वादी यांनी सदर दाव्यासोबत सदरच्या नोटीस माफीचा अर्ज दिलेला असून मा. कोर्टाने सदरच्या नोटीसीची माफी दयावी अशी विनंती केली आहे. प्रतिवादी यांनी वादी यांना दिनांक ०१.०६.२०२१ रोजी व दिनांक १५.०७.२०२१ रोजी नोटीसी पाठवून तसेच दिनांक १६.१२.२०२१ रोजी सभा घेउन दावा मिळकती वरील वादी यांचे दुकान काढून घेण्याचे लेखी सांगितल्याने दिनांक १६.१२.२०२१ रोजी सदरचा दावा दाखल करण्यासाठी कायदेशीर कारण घडले आहे. वादीचा दावा हा प्रथमदर्शनी असून वादीकडे दावा सिध्द करण्यासाठी पुरावा आहे. त्यामुळे वादीने सदरचा कायम स्वरुपी मनाई हुकूमाचा दावा दाखल केला असून त्यामध्ये वादी

तात्पुरत्या मनाई हुकूमाचा प्रस्तुत अर्ज केला आहे व तात्पुरता मनाईहुकूम देण्यात यावा अशी या अर्जाद्वारे विनंती केलेली आहे.

**५.** प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्र. १ व २ यांनी नि. क्र. २१ वर लेखी जबाब आणि म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादींनी, वादीने दाव्यात नमूद परिच्छेद क्र. १ व दावा विषय मधील मजकूर चुकीचा व खोटा आहे व सत्य परिस्थिती लपवून जे आहे नाही ते दाखवून मा. न्यायालयाची दिशाभूल केलेली आहे म्हणून प्रतिवादींना सदर मजकूर मान्य नाही, असे नमूद केले आहे. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार, खरी परिस्थिती अशी आहे की, ग्रामपंचायत अंधारी हे गाव नमूना नं. ८ ज्याचे अ. क्र. ८८० व मारोती मंदिर परिसर असे नाव असून मालमत्ता क्र. ८८० असे आहे. ज्याचे एकूण क्षेत्र ३५ x २७ ज्याचे ९४५चौ. फुट होतात व ग्रामपंचायत अंधारीने आर.सी.सी. बांधकाम करुन त्यावर दोन गाळे बांधलेले आहे. प्रतिवादींनी गाव नमूना नं. ८ चे उतारा नक्कल सोबत दाखल केली आहे. पुढे असे की, ग्रामपंचायत अंधारी कार्यालय हे जुनी दगड माती व चुनाची दीर्घकालीन व इमारत असून ती, इमारत जुनी झालेली असून धोकादायक आहे व कोणत्याही क्षणी पडू शकते व जिव जाण्याची शक्यता आहे व इतर कार्यालय उपलब्ध नाही. याकरिता गाव नमूना नं. ८८१ ग्रामपंचायत कार्यालय अंधारीचे गाव नमूना नं. ८८१ ग्राम पंचायत कार्यालय अंधारीचे गांव नमूना क्र. ८ सोबत दाखल केले आहे. अशा परिस्थितीमध्ये गांव नमूना नं. ८८० मधील दोन गाळे मध्ये ग्रामपंचायतचे कार्यालय हलविण्याची तयारी ग्रामपंचायत ने दर्शविलेली असून वादी हे जाणून बुजून गावाचे व ग्रामपंचायतचे विकास कार्यामध्ये अडथळा निर्माण करत आहे. प्रतिवादीचे म्हणण्यानुसार वादी वर ग्रामपंचायतचे गाळा क्र. २ चे भाडे हे रक्कम रु. २५,६००/– थकीत असून त्याबद्दल त्यांना नोटीसही देण्यात आलेली आहे. तरी सदर नोटीसचा जबाब ही दिला नाही व भाडे ही दिले नाही या मध्ये वादी कसुर करत आहे. भाडे थकित म्हणून वादी हे दादागिरीची भाषा वापरत असून त्यांना दिलेले गाळयाचा गैरवापर करुन दुस–याला दुकान दिली आहे. त्यामुळे दुकान खाली करणे संदर्भात नोटीस दिली आहे. प्रतिवादींनी सदर नोटीसची प्रत सोबत दाखल केली आहे. प्रतिवादींचे म्हणणे असे की, दाव्यात

नमूद परिच्छेद क्र. २ मधील मजकूर ग्रामपंचायत अंधारी हे मालक असल्याबद्दल मान्य असून उर्वरीत मजकूर खोटा व बनावटी असून ग्रामपंचायत हे बोलीवर भाडयाने देत नाही. तसेच वादी यांनी ग्राम पंचायतचे तसेच ठरावाची नक्कल मा. न्यायालयात दाखल करण्याची व परिच्छेद क्र. २ मधील मजकूर शब्दात साबीत करण्याची जबाबदारी त्याचेवर आहे. दाव्या नमूद परिच्छेद क्र. ३ मधील मजकूर फक्त आर.सी.सी. बांधकाम व शटर बद्दल खरा आहे तसेच वादीा जर भाडयाने दुकान दिली तर त्याचा उपयोग त्यांचे वंश परमपरागत करण्यासाठी नाही व यात भाडे तत्वाचा उल्लंघन करण्यात आलेला असून वादी हे जाणून बुजून भाडे देत नाही, यात कसूर करत असून वादीला मजकूर मध्ये उल्लेख करण्यात आले असून नोटीस देण्यात आलेली आहे व वादी हे ग्रामपंचायतची उत्पन्न बुडविण्याचे प्रयत्नात आहे. दाव्यात नमूद परिच्छेद क्र. ४ मधील मजकूर खोटा बनावटी व चुकीचा आहे, वादीने असे कोणतेही भाडयाची पावत्या मा. न्यायालयात दाखल केली नाही व त्यांना सदर भाडे पावत्या मा. न्यायालयात दाखल करावे म्हणून सदरचे मजकूर नाकारण्यात येत आहे. तसेच आजच्या महागाईच्या दरामध्ये १२०० भाडे ही पुरेशी नाही. दाव्यात नमूद परिच्छेद क्र. ५ मधील मजकूर खोटा व बनावटी असून पुर्णपणे नाकारला आहे. तसेच वदीचे कथन हे पुर्वीचे परिच्छेद क्र. ३ मध्ये नमूद प्रमाणे तफावत निर्माण करतात व तो किती धनवान आहे हे सिध्द होते की, त्याने एक ते दिड लाखाचे फर्निचर व सहा लाखाचा माल आहे, ग्रामपंचायतचे गाळेचे भाडे थकित ठेवतात व मुलगा हे सुशिक्षीत बेरोजगार आहे. यावरुन हे सिध्द होत आहे की, हे खोटारडा व खोडसाळ स्वभावाचा असून त्याचे हेतूने ग्रामपंचायतचे गाळे हडप करण्याच्या तयारीत आहे. दाव्यात नमूद परिच्छेद क्र. ६ व ७ मधील मजकूर खोटा व बनावटी असून सर्व आरोपी खोटे आहे. तसेच सदर मजकूर सिध्द करण्याची जबाबदारी वादींवर आहे म्हणून संपुर्ण मजकूर नाकारला असून दाव्यात नमूद परिच्छेद क्र. ८ मधील मजकूर खोटा व बनावटी असल्याचे कथन केले आहे. त्याचप्रमाणे दाव्यात नमूद परिच्छेद क्र. ९, १०, ११, १२ खोटा व बनावटी व कल्पोकल्पीत असून पुर्णपणे नाकारला आहे. कथीत मजकूराप्रमाणे असे काहीही घडलेले नाही. प्रतिवादींचे म्हणणेनुसार, वादी यांना सदर दावा दाखल करण्याचा अधिकार नसून असे कोणतेही कारण दावा दाखल करण्यास घडलेले नाही, वादी हे फक्त

ग्रामपंचायत अंधारीला त्रास देण्यासाठी दडपण निर्माण करुन भाडे गिळंकृत करण्यासाठी करत आहे. वादी यांचा दावा व दाव्याचे समतोल वादीच्या हक्कात नाही याउलट जर वादीला मनाई हुकूमाचे आदेश मिळाले तर प्रतिवादी ग्राम पंचायतचे गंभीर, नुकसान होईल कारण की, ग्रामपंचायतची जुनी इमारत जीर्ण झालेली असून कार्यालयसाठी इतरत्र कोणतीही जागा उपलब्ध नाही व ग्रामपंचायत हे रोडवर येईल व ग्रामपंचायत सर्व कार्यालय हे बंद पडतील तसेच अभिलेख हे शराब होतील व सर्व गावचे काम पुर्णपणे बंद पडतील कारण की, सर्व व्यवस्था हे ग्राम पंचायत द्वारे करण्यात येते त्यामुळे गावचे विकास कार्ये थांबतील तसेच वादी यांनी खरी परिस्थिती लपविली आहे की, त्याने ग्रामपंचायतचे भाडे नियमितपणे भरले नाही, म्हणून वादी हे कोणत्याही मनाई हुकूमाचा, आदेशाला पात्र नाही या मुद्यावर वादीचा अर्ज नामंजूर करुन फेटाळण्यात यावे अशी विनंती केली आहे.

**६.** प्रस्तुतच्या अर्जावर वादीतर्फे ॲड. एस. के. ढाकरे आणि प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे अनिस अहेमद यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

**७.** वादीने या अर्जाच्या समर्थनार्थ दस्त यादीसोबत, दिनांक ०१.०६.२०२१ रोजीच्या नोटीसची छायांकित प्रत, दिनांक १५.०७.२०२१ रोजीची नोटीस क्र. २ ची छायांकित प्रत, दिनांक ०८.१०.१९९८ ची सामान्य पावती, सन १९९५ रोजीचा दुकान परवान्याची छायांकित प्रत, दिनांक १७.०६.२०२१ रोजीच्या ग्रामपंचायत कार्यालय, अंधारी यांना केलेल्या विनंती अर्जाची छायांकित प्रत, दिनांक १६.१२.२०२१ रोजी ग्रामपंचायत कार्यालय, अंधारी यांचे प्रोसिडींग बुकाची छायांकित प्रत दाखल केली आहे. तसेच, नि. क्र. १८ दस्त यादीसोबत, वर नमूद दस्तांच्या मुळ प्रती व सामान्य पावती दिनांक ०८.१०.१९९८, दिनांक ०२.११.१९९९, दिनांक २४.०४.२०००, दिनांक ०२.०४.२००२, दिनांक ३१.०३.२००३, दिनांक १०.०६.२००५, दिनांक ३०.०९.२००५, दिनांक २३.०१.२००९, दिनांक १०.०१.२००९,

दिनांक २९.१२.२००९, दिनांक २१.०१.२०१०, दिनांक १७.१२.२०११, दिनांक १८.१०.२०११, दिनांक१३.०९.२०११, दिनांक ०२.०९.२०१३, दिनांक २५.०२.२०१४, दिनांक २२.०९.२०१५, दिनांक १५.१२.२०१७, दिनांक २३.०२.२०१८, दिनांक ०६.०३.२०१८, दिनांक १८.१०.२०१६, दिनांक १०.१२.२०१९, दिनांक ०३.१२.२०२०, दिनांक ०८.०९.२०१९, दिनांक ०९.११.२०२०, दिनांक १४.०६.२०२१ इ. दाखल केले आहेत. तर प्रतिवादींनी त्यांचे कथनास समर्थन करण्याकरिता नि. क्र. २० वरील यादीसोबत गाव नमूना नं. ८ ची प्रमाणीत प्रत, सन २०१८–२०२२, दिनांक ०७.०६.२०२१ व दिनांक १५.०७.२०२१ रोजी वादी यांना दिलेली नोटीस, दिनांक १६.१२.२०२१ रोजीची वादींना दिलेली नोटीस दाखल केली आहे. त्याचप्रमाणे दस्तयादी नि. क्र.३० सोबत ग्रामपंचायत कार्यालय अंधारी यांनी पोलीस स्टेशन, सिल्लोड ग्रामीण यांना दिलेले पत्र, तसेच कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग जि. प., औरंगाबाद यांना दिलेले पत्र, गाव नमूना नं. ८ सन २०१८ ते २०२२, जि. प. औरंगाबाद यांचेकडून ग्रामपंचायतची जिर्ण झालेली इमारत व दुकान गाळे पाडण्याचा प्रस्ताव सादर करणेबाबतचे पत्र आणि इमारत बांधकाम पाडणेबाबत, प्रस्ताव मंजूर झाल्याचे सदर कार्यालयाचे पत्र, यांची छायांकित प्रत दाखल केल्या आहेत.

८. वादीने अर्जाचे समर्थनार्थ मा. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडा **KALYANPUR LIME WORKS LTD. VS. STATE OF BIHAR AND DALMIA JAIN AND COMPANY LTD – 1954 SCR 958 : AIR 1954 SC 165,** यावर भिस्त ठेवली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडयाचे काळजीपुर्वक वाचन केले आणि सविनय स्वितकृत केले. वादीच्या वकिलांनी प्रस्तुत न्यायनिवाडयामधील परिच्छेद क्र. १९ आणि २० कडे युक्तीवादादरम्यान विशेष लक्ष वेधले. मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर परिच्छेदामध्ये Sec. 15 and Sec. 18 (A) of the Specific Relief Act, बाबत भाष्य केले आहे.

९. प्रतिवादीने पुढील न्यायनिवाडयांवर भिस्त ठेवली आहे–I). **MAHADEO KASHIBA WAGHMODE AND ORS.VS. KALLAPA SHINDLINGA WAGHMODE AND ORS**. – 2015 **BHCCO** 59892 (2016 (1) **ALL MR** 404:) 2016(1) **ALLMR**404, मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या या न्यायनिवाडयाचे काळजीपुर्वक वाचन केले असता, असे निदर्शनास येते की, मा. न्यायालयाने कलम १००, दिवाणी प्रक्रिया संहिता, कलम ११० भारतीय पुरावा अधिनियम याबाबत भाष्य केलेले असून परिच्छेद क्र. ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणामध्ये वाद जमीन ही वादीच्या वडीलांच्या मृत्युनंतर वादींच्या प्रत्यक्ष ताब्यामध्ये होती. परंतु प्रतिवादी हे ग्रामपंचायतचे अभिलेखामध्ये त्यांची नावे नोंद करण्याकरिता फेरफार घेण्यासाठी अर्ज करुन पुढील कार्यवाही करित होते. प्रस्तुत न्यायनिवाडयाचे वस्तुस्थीती आणि ज्या प्रकरणामध्ये नि. क्र. ५ चा आदेश करणे आहे, त्यांची वस्तुस्थीती पुर्णतः भिन्न असल्याने, या मा. उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयाचे निर्देश जसेच्या तसे लागू होत नाही. II). **BANT SINGH** & **ANR**. **VS**. **NIRANJAN SINGH** (**D**) **BY LRS**. & **ANR**.–2008 **STPL** 5683 **SC** (**AIR** 2008 **SC** 1512= (2008) 4 **SCC**75 =**JT** 2008 (2) **SC** 452 = 2008 **AIR**(**SCW**)1611), मा. सर्वोच्च न्यायालयाचा प्रस्तुत निवाडयाचे काळजीपुर्वक वाचन केले असता, त्यामध्ये कलम ५०, ६० भारतीय पुरावा अधिनियम याबाबत सविस्तर भाष्य केले आहे. परंतु, येथे विशेष नमूद करण्याची बाब अशी की, प्रस्तुत प्रकरणामध्ये वडीलोपार्जित मालमत्तेबाबत असल्याने, या अर्जास निकाली काढतेवेळी पुर्णपणे लागु करता येणार नाही. III). **SHRI**. **GOVIND ANAND GOLTEKAR** (**DECEASED THROUGH L.RS**.) **VS**. **SHRI**. **DASHRATH DEOBA GOLTEKAR**– 2006 **BHCCO** 1644 2006 (2) **B**. **C**. **J**. 535: 2006 (0) **AIR** (**Bom**)174:2006 (2) **AIR Bom R** 811: 2006 (3) **ALL MR** 487 2006 (2) **B C R**910:) मा. उच्च न्यायालयाच्या प्रस्तुत न्यायनिवाडयाचे काळजीपुर्वक वाचन केले. त्यामध्ये मा. न्यायालयाने

कलम १०५ लँड रेव्हेन्यु कोड, १९६८ संदर्भात विशेष भाष्य केले आहे. IV). – **NARASAMMA** & **ORS**. **VS**. **STATE OF KARNATAKA** & **ORS**. 2009 **STPL**, 6919 **SC**, (2009 **AIR** (**SCW**) 2653 = (2009) 5 **SCC** 59(=(2009)4 **SCR** 929=2009 (4) **SCALE**618), मा. सर्वोच्च न्यायालयाच्या प्रस्तुत न्यायनिवाडयाचे सदर अर्जाच्या अनुषंगाने काळजीपुर्वक वाचन केले.

**१०.** वादीच्या अर्जातील कथने, आणि अभिलेखावरील कागदोपत्री पुरावा विचारात घेता या अर्जाच्या निवाडयासाठी माझेसमोर खालील मुद्दे उपस्थित झाले, त्यावर कारणांसह पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादीने हे सिध्द केले आहे का, की, त्यांची प्रथमदर्शनी केस (दावा) आहे का? | होय |
| २ | वादीने हे सिध्द केले आहे का, की, न्यायाचा समतोल त्यांच्या बाजुने आहे ? | होय |
| ३ | वादीने हे सिध्द केले आहे का, की, तुर्तातुर्त मनाई हुकुम न दिल्यास त्याचे कधीही न भरुन येण्याजोगे नुकसान होणार आहे काय? | होय |
| ४ | काय आदेश ? | अंतिम आदेशानुसार अर्ज मंजूर |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र. १ ते ३ करीता –**

**११.** वादीचे कथन की, दावा मिळकत ही ग्रामपंचायत अंधारी यांच्या मालकीची असून

सन १९९७–९८ मध्ये गावच्या विकासासाठी व ग्रामपंचायतचे उत्पन्न वाढावे म्हणून दावा मिळकत ग्रामपंचायत अंधारी यांनी वादी यांना ३० वर्षाच्या मुदतीसाठी पुन्हा नुतनीकरण करण्याच्या बोलीवर भाडयाने दिलेली असून ग्रामपंचायतने तसा ठराव घेउन वादी यांचेकडून १०,०००/– रुपये अनामत रक्कम घेउन दावा मिळकतीचा ताबा वादी यांना दिला होता. दावा मिळकत ही आर. सी. सी. मध्ये बांधकाम केलेली असून त्यावर शटर बसविलेले आहे. वादी यांचे पुत्र गणपत सखाराम तायडे हे सुशिक्षीत बेरोजगार असल्याने वादी यांनी त्यांच्या मुलासह दावा मिळकतीत कापड दुकान सन १९९८ मध्ये टाकलेले असून तेव्हापासून आजपर्यंत दावा मिळकतीत वादी यांचे कापड दुकान विनातक्रार व विनाअडथळा चालु असून वादी हे ग्रामपंचायत अंधारी यांना दर महिन्याला नियमित भाडे देत आहेत. वादी यांचे पुढे असे कथन की, त्यांनी सन १९९८ मध्ये दावा मिळकत भाडयाने घेतल्यानंतर सुरुवातीला त्यांना ६००/– रुपये महिना होता व वेळोवेळी ग्रामपंचायतने घेतलेल्या ठरावानुसार सदरचा महिना आज रोजी १२००/– रुपये झालेला असून वादी हे नियमित ग्रामपंचायतला भाडे देत आहेत व त्या संबंधी वादी यांचेकडे भाडे पावत्या उपलब्ध आहेत. वादी यांनी प्रतिवादी यांचेकडून जागा भाडयाने घेतल्यानंतर त्यामध्ये साधारणतः गेल्या वीस ते पंचवीस वर्षापुर्वी एक ते दिड लाख रुपयाचा माल असून वादी व त्यांचे चिरंजीव गणपत यांचा उदरनिर्वाह सदर दुकानावर अवलंबून असून वादी हे सदर दुकानावर आपली उपजिविका भागवत आहेत. वादीचे कथन की, गेल्या एक ते दिड वर्षापुर्वी ग्रामपंचायत अंधारी येथे ग्रामपंचायत निवडणूक होउन त्यामध्ये आज रोजी सत्तेत असलेल्या सत्ताधारी पक्षाचे १० सदस्य व विरोधी पक्षाचे सात सदस्य निवडून आलेले असून विरोधी सदस्य असलेले अरुणाबाई लक्ष्मण तायडे यांचे सासरे सदाशिव गोविंदा तायडे हे ग्रामपंचायतमध्ये सत्ताबदल झाल्यामुळे त्यांच्या जवळ असलेल्या लोकांना त्रास दयावा या उद्देशाने ग्रामपंचायत अंधारी हे ऐनकेन प्रकारे वादी यांना त्रास देउन त्यांची दुकाने खाली करुन सदर ठिकाणी त्यांच्या विचारांच्या लोकांना जागा देउ पाहत आहेत. त्यामध्ये, ते सफल झाले तर वादी यांचे आयुष्यात कधीही भरुन न निघणारे नुकसान होईल. वादी यांच्या दुकानाच्या पश्चिमेस नजिमोद्दीन मोहम्मद सय्यद यांचे दुकान नंबर १०७ असून त्यानंतर सार्वजनिक पाच फुटाची गल्ली आहे व सदर गल्लीचा

वापर संपुर्ण अंधारी येथील लोक रस्त्यासाठी करत असून त्यानंतर ग्रामपंचायतची साधारण अडीच ते तीन हजार चौ. फुट जागा असून त्यावर ग्रामपंचायतचे बांधकाम झालेले आहे व आजही सदर ठिकाणी ग्रामपंचायत कार्यरत आहे. प्रतिवादी हे वादीस दावा मिळकतीमध्ये अडथळा निर्माण करीत आहे, त्यामुळे प्रतिवादी यांना दावा मिळक्तीमध्ये येवून वादीच्या ताब्यास अडथळा निर्माण करु नये म्हणून वेळीच पावबंद करणे आवश्यक आहे, नसता वादीचा दावा मिळकतीवरील ताबा जाण्याची भिती निर्माण झाली आहे. प्रतिवादी हे त्यांच्या हेतूमध्ये साध्य झाले तर वादीचा दावा मिळकतीवरील असलेला ताबा जाण्याची दाट शक्यता निर्माण झालेली आहे, आणि या कथनाच्या समार्थनार्थ वादीने दस्त यादीसोबत वर नमूद केल्याप्रमाणे करपावती व इतर कागदपत्रे दाखल केली आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादीच्या म्हणणेतील कथनानुसार, दावा मिळकत वादीच्या ताब्यात असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे कारणमिमांसेचा एकत्रीत विचार करता अर्जात नमूद केलेल्या दावा मिळकतीत वादीचा हक्क व अधिकार आहे, वादी दावा मिळकतीच्या ताब्यामध्ये असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते म्हणून वादीने प्रथमदर्शनी केस (दावा) आहे. त्याचप्रमाणे वादीने दाखल केलेल्या कर पावत्या व इतर नोटीस, तसेच ग्रामपंचायत प्रोसिडींग बुक, व्यवसाय परवाना, या वरुन वाद मालमत्ता वादीच्या ताब्यात असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. परंतु वादीने दाखल केलेले दस्त प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार खोटे व बनावट आहेत किंवा नाही आणि सदर मालमत्ता मोडकळीस आली असल्याचे व नवीन बांधकामाचे आवश्यकता असलेबाबत, पुर्वपरवानगी व इतर कार्यवाही हा पुराव्याअंती सिध्द होणारा मुद्दा आहे. त्यामुळे वादीने जरी त्याचे ताब्यास प्रतिवादीने अडथळा निर्माण केला हे दर्शविणारे कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नसला तरी सुध्दा सद्यस्थितीमध्ये वादीची प्रथमदर्शनी केस असल्यामुळे न्यायाचा समतोल हा वादीच्या बाजुने आहे हे म्हणणे न्यायोचित ठरेल. अशापरिस्थितीत तुर्तातुर्त मनाई हुकुम न दिल्यास वादीचे नुकसान होईल ही बाब वादीने सिध्द केली आहे. म्हणून मी मुद्दे क्र. १ ते ३ करिता होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ साठी</u> –**

**१२.** वर केलेली चर्चा व मुद्दे क्र. १ ते ३ चे निष्कर्ष विचारात घेता वादीचा अर्ज मंजुर

होण्यास पात्र आहे.  म्हणून मी मुद्दा क्र. ४ चे उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादींचा निशाणी ५ चा अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी त्यांचे नातेवाईक, त्यांचे नोकर चाकर अथवा त्याच्यातर्फेअन्य कोणत्याही व्यक्तीने मौजे सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद येथील जुने दुकान नंबर २ ज्याचा नवीन गाळा क्र. १०८, क्षेत्र १२ फुट x20 फुट ज्याची चतुःसिमा पुर्वेस –जमील शेठ यांचे घर,पश्चिमेस –नजिमोद्दीन मोहम्मद सय्यद यांचे दुकान नं.१०७, त्यानंतर पाच फुटाची बोळ व त्यानंतर ग्रामपंचायत कार्यालय, अंधारी, दक्षिणेस – जमील शेठ यांची जागा, उत्तरेस – रोड. या चतुःसिमेच्या आतील वादी यांच्या मालकी, ताब्यातील मिळकतीमध्ये वादीच्या शांततामय ताब्यास हरकत व अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकुम दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत देण्यात येत आहे.

३. वादी व प्रतिवादी यांनी अर्जाचा खर्च ज्याचा त्यांनी सोसावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MINAKSHI MANOHAR DHANRAJ
Date: 2022.10.03 13:23:54 +0530

(श्रीमती मिनाक्षी म. धनराज)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सिल्लोड.

दिनांक: ०१.१०.२०२२

**CERTIFICATE**

" I affirms that the contents of this P.D.F. file order are same word to word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | B.S. Jadhav |
| Court Name | : | Smt. Minakshi M. Dhanraj<br>Civil Judge Junior Division,<br>Sillod. |
| Date | : | 01.10.2022 |
| Order signed by<br>presiding officer on | : | 01.10.2022 |
| Order uploaded on | : | 03.10.2022 |